**मृत ग्राहकांची मालमत्ता त्यांच्या कायदेशीर वारसदारांकडे / दावेदारांकडे सोपवणे**

**डीबीओडी, बीसी. क्रमांक ५५/०९.०७.००७/२००१-०२**

१ जानेवारी २००२

सर्व व्यावसायिक बँका
(प्रादेशिक ग्रामीण बँका सोडून)

माननीय महोदय,

**मृत ग्राहकांची मालमत्ता त्यांच्या कायदेशीर वारसदारांकडे / दावेदारांकडे सोपवणे**

आमच्या १४ मार्च, २००० रोजी जारी करण्यात आलेल्या डीबीओडी.बीसी.क्रमांक १४८/०९.०७.००७/१९९९-२००० या परिपत्रकात असे सुचविण्यात आले आहे की,ज्या मृत खातेदाराच्या खात्यात २५ हजारापेक्षा अधिक रक्कम नाही, अशा मृत खातेदाराच्या कायदेशीर वारसदारांकडे ती रक्कम सोपवण्यासाठी बँकांनी वारसाहक्क प्रमाणपत्राचा आग्रह धरू नये.

तसेच आमच्या ६ डिसेंबर २००० रोजी जारी करण्यात आलेल्या डीबीओडी. बीसी. क्रमांक ५६/ ०९.०७.००७/ २०००-०१ या परिपत्रकामध्ये आम्ही या संदर्भात काही संरक्षक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार, मृत ठेवीदाराच्या कायदेशीर वारसदारांकडे बँका खालील परिस्थितीत वारसाहक्क प्रमाणपत्राची मागणी करु शकतात.

जर मृत व्यक्तींची मालमत्तेसंदर्भात वाद असतील, आणि त्याच्या सर्व कायदेशीर वारसदारांनी बँकेकडे रकमेची मागणी केली नसेल तर

ज्या दावेदारांनी बँकेकडे मृत खातेदाराच्या ठेवी सोपविण्यासाठी मागणी केली असेल, केवळ तो/ तेच त्या मृत व्यक्ती वारसदार आहेत, याविषयी बँकेच्या मनात सकारण शंका असेल तर
---
२. बँकांनी असा युक्तीवाद केला आहे की वर जी तत्त्वे लागू करण्यात आली आहेत तीच तत्त्वे खाली दिलेल्या मुद्यांसाठीही लागू होतील :-
ठेवी व्यतिरिक्त मृत खातेदाराच्या ज्या काही वस्तु बँकेच्या लॉकरमध्ये ठेवल्या असतील त्या वस्तू सोपवणे आणि मृत खातेदारानं आपल्या गुंतवणूकीवर काही कर्ज काढले असेल तर अशा परिस्थीतितही बँका वारसहक्क प्रमाणपत्रासाठी आग्रह धरू शकतात.

३. बँकांनी यासंदर्भात आमच्याकडे जो काही युक्तिवाद केला, त्यावर आम्ही भारतीय बँक संघटनेचाही सल्ला घेतला असून, बँकांनी वर दिलेल्या कारणांशिवाय इतर परिस्थितीत, मृत खातेदाराची इतर मालमत्ता त्याच्या वारसदाराकडे सोपवताना, कायदेशीर वारसाहक्क प्रमाणपत्राचा आग्रह धरु नये असा निष्कर्ष आम्ही काढला आहे. संदर्भासाठी बँकांनी आमच्या ६ डिसेंबर २००० रोजी जारी करण्यात परिपत्रकाचा वापर करावा.

४. कृपया या परिपत्रकाची पोच द्यावी.

**आपला विश्वासू,**
**के . एन. रुपानी**
**उप महाव्यवस्थापक**